# श्री. गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालयात ‘सायबर शिक्षा, सायबर सुरक्षा’ उपक्रम संपन्न..



लातूर, दि. १४ : लातूर येथील गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालयात माहिती तंत्रज्ञान विभाग- राजर्षी शाहू महाविद्यालय व क्विक हिल फाऊंडेशन तर्फे आयोजित 'सायबर शिक्षा सायबर सुरक्षा' हा उपक्रम शाळेत राबवण्यात आला. त्यानिमित्त बी.सी.एस. तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनी कु. चव्हाण मधुरा सुधीर, कु. तट ऋजुता सुधाकर, कु. हुडगे पुनम शिवानंद यांनी शाळेला भेट दिली. मोबाईल वापरताना कोणती काळजी, काय दक्षता घ्याव्यात? आपला पिन नंबर कसा टाकावा? कोणतेही प डाऊनलोड करु नयेत. ऑनलाइन जगतातील सर्व धोके व त्याबाबतची दक्षता याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

१९३० हा सायबर हेल्पलाइन नंबर विद्यार्थिनींना दिला. 'Think before click', 'Stranger is Danger' असा सल्ला विद्यार्थिनींना दिला. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. बोरगावकर सुनीता विद्यार्थिनींना याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती चोपणे प्रतिभा यांनी केले. कार्यक्रमास इयत्ता पाचवी ते सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांनी, शिक्षिका वृंद व कर्मचारी वृंद यांची उपस्थिती होती.